<u>नियमित दिवाणी मुकदमा नं. ६६४/२०२२ – निशाणी १९ लगत आदेश</u>

चंद्रकांत संदिपान केंगार इ. वि. मनोहर गणपत केंगार इ.

CNR No. MHSO2000-2693-2022

प्रस्तुतचा अर्ज वादी तर्फे मयत प्रतिवादी क्र.४ यांचे बाबत दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथन असे की, सदर दावा प्रलंबित असताना यातील प्रतिवादी क्र.४ गंगुबाई गणपत केंगार हे दि.०३/०१/२०२३ रोजी मयत झाले आहेत. सदर मयतास पती, मुलगा व मुलगी असे वारस असुन ते यापुर्वीच प्रतिवादी क्र.१ ते ३ म्हणुन दाव्यात समाविष्ठ केलेले आहेत. सदर प्रतिवादी क्र.४ यांना गंगुबाई गणपत केंगार यांना प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे शिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.१ ते ३ हेच मयत गंगुबाई गणपत केंगार यांचे वारस आहेत. प्रवितादी क्र.४ यांचे नावास काट मारुन त्याप्रमाणे दुरुस्ती प्रमाणे करण्यास परवानगी मिळण्याची व अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. सदर दाव्याचे प्रतिवादी हजर न झालेमुळे त्यांचे विरुध्द एकतर्फा चौकशीचा आदेश पारित करणेत आला.

४. वादीतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्जातील मजकूर आणि दाव्याचे स्वरुप पाहिले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.४ गंगुबाई गणपत केंगार हे दि.०३/०१/२०२३ रोजी मयत झाले आहेत. सदर प्रतिवादी क्र.४ यांचे मयताबाबत मृत्यू प्रमाणपत्र निशाणी १८ सोबत दाखल केले आहे. सदर मृत्यू पत्राचे अवलोकन करता प्रतिवादी क्र.४ मयत

असल्याचे स्पष्ट होत आहे. मयत प्रतिवादी क्र.४ यांचे कायदेशीर वारस पती, मुलगा व मुलगी हे दाव्यात यापूर्वीच सामिल आहेत. वादी यांनी दाव्याचे सरनाम्यात प्रतिवादी क्र.४ यांचे नावाचे समोर "मयत" असे लिहीणेस परवानगी मिळण्याची विनंती केली. वादी करु इच्छीत असलेली दुरुस्ती केल्याने प्रतिवादींच्या न्याय्य हक्कांवर कोणताही परिणाम होणार नाही. याउलट दाव्याच्या अंतिम निकालाच्या वेळी संदिग्धता राहणार नाही. सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे, त्यामुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात किंवा विषयात बदल होणार नाही. अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट, अर्ज मंजूर केल्यामुळे दोन्ही पक्षकारांमध्ये वाद मिटण्यास मदत होणार आहे. त्यामुळे भविष्यातील गुंता टाळण्यासाठी सदरची दुरुस्ती करणे आवश्यक वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो –

**– आ दे श –**

१. वादी यांचा अर्ज (नि.१९) मंजूर करण्यात येतो.

२. सदर आदेशाच्या दिनांकापासून वादी यांनी अर्जामध्ये मागितलेली दुरुस्ती करुन, दुरुस्ती प्रत १४ दिवसांचे आत हजर करावी.

PRACHI RAVINDRA KULKARNI

Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2025.10.10 13:40:06 +0530

सांगोला.
दिनांक: ०९/१०/२०२५

(श्रीमती पी. आर. कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सांगोला

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Smt. P. R. Kulkarni,<br>Civil Judge, J. D. & J. M. F. C. Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P. O. on | : | 09/10/2025 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 10/10/2025 |